१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-

१.१ राज्य शासनाच्या न्यायिक सेवेतील दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात :-

१.२ पदांचा तपशील :-

(१) संवर्ग :- राज्य शासनाच्या न्यायिक सेवेतील राजपत्रित, गट-अ ची पदे.

(२) नियुक्तीचे ठिकाण :- न्यायिक सेवेमध्ये महाराष्ट्रात कोठेही नियुक्ती होईल.

(३) वेतनबँड :- रुपये २७,७०० ते रुपये ४४,७७०

(४) उच्च पदावर बढतीची संधी :- ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र न्यायिक सेवेतील वरिष्ठ पदांवर .

१.३ जाहिरात / अधिसूचनेमध्ये भरावयाच्या पदांचा तपशील देण्यात येईल. पदसंख्या शासनाने कळविल्यानुसार राहील व विज्ञापनेत प्रसिद्ध केली जाईल.

१.४ महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम, २००८ आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी सदर नियमामध्ये केलेल्या सुधारणानुसार प्रस्तुत प्रकरणी पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

२. परीक्षेचे टप्पे :- तीन. (१) पूर्व परीक्षा-१०० गुण. (२) मुख्य परीक्षा-२०० गुण. (३) मुलाखत-५० गुण.

३. अर्हता :-

३.१ वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांचेकरिता :-

(एक) वय जाहिरात / अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास २१ वर्षांपेक्षा कमी व ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

(दोन) जाहिरात / अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास विधी शाखेतील पदवी आणि उच्च न्यायालयातील किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयामधील वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून ३ वर्षांचा वकिली व्यवसाय.

(तीन) पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल.

(चार) मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता, लिहिता येणे आवश्यक

(पाच) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे आवश्यक

(सहा) मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक.

३.२ नवीन विधी पदवीधरांकरिता :-

(एक) वय जाहिरात / अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास २१ वर्षांपेक्षा कमी व २५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

(दोन) विधी शाखेतील पदवी अभ्यासक्रमाचे प्रत्येक वर्ष प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन प्राप्त केली असली पाहिजे आणि विधी पदवीच्या अंतिम वर्षास किमान ५५% इतके गुण पहिल्या प्रयत्नात प्राप्त करणे आवश्यक किंवा विधी मधील पदव्युत्तर पदवी किमान ५५% इतक्या गुणांनी उत्तीर्ण झाला असणे आवश्यक.

(तीन) मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता, लिहिता येणे आवश्यक.

(चार) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे आवश्यक.

(पाच) मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

३.३ उच्च न्यायालयाच्या लिपिकवर्गीय कर्मचारीवर्गाचे सदस्य, उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य, मंत्रालयाच्या विधि व न्याय विभागाच्या विधि उप-विभागामध्ये विधि सहायक आणि त्यापेक्षा उच्च पदावर काम करणा-या कर्मचारी वर्गाचे सदस्य, उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकीलांच्या कार्यालयातील लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य यांचेकरिता :

(एक) वय जाहिरात / अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास २१ वर्षांपेक्षा कमी व ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

(दोन) विधि पदवी प्राप्तीनंतर जाहिरात /अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास किमान तीन वर्षांची सेवा झालेली असणे आवश्यक.

(तीन) मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता, लिहिता येणे आवश्यक.

(चार) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे आवश्यक.

(पाच) मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

३.४ प्रस्तुत पदाच्या जाहिरातीच्या दिनांकापर्यंत संपादन केलेली अर्हता व अनुभव सदर पदासाठी पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल. सक्षम विद्यापिठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे, असे समजण्यात येईल.

३.५ लेखी परीक्षेच्या कालावधीत नक्कल किंवा गैरवर्तणूक केलेल्या किंवा फौजदारी केसेसमध्ये शिक्षा झालेल्या किंवा न्यायिक सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या /काढून टाकलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या किंवा कोणत्याही पदाचा प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न करणारा अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी अपात्र ठरविलेला उमेदवार प्रस्तुत स्पर्धा परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरविला जाणार नाही.

४. शुल्क (फी) :-

४.१ प्रस्तुत परीक्षेकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	परीक्षेचे नांव	अमागास	मागासवर्ग
(१)	पूर्व परीक्षा	३७३	२७३
(२)	मुख्य परीक्षा	५२३	३२३

४.२ वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रीमी लेअर)उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

४.४ दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च,१९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून,१९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

५. परीक्षा योजना :-

५.१ पूर्व परीक्षा : -

५.१.१ परीक्षा योजना :-

(१) प्रश्नपत्रिका:- एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

विषय व संकेतांक	दर्जा	माध्यम	प्रश्नांची संख्या	एकूण गुण	कालावधी	परीक्षेचे स्वरुप
विहित कायदेविषयक ज्ञान (संकेतांक ५०२)	पदाला साजेसा	इंग्रजी	१००	१००	दोन तास	वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

५.१.२ पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम:-

(१) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (२) सिव्हिल प्रोसिजर कोड (३)एव्हिडन्स ॲक्ट (४) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट (५)स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट (६) महाराष्ट्र रेंट कंट्रोल ॲक्ट (७) लिमिटेशन ॲक्ट (८) कॉन्स्टिट्युशन ऑफ इंडिया (९) इंडियन पिनल कोड (१०) लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुड्स ॲक्ट ॲण्ड पार्टनरशिप ॲक्ट

५.२ पूर्व परीक्षेचा निकाल :-

५.२.१ वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

५.२.२ भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

५.२.३ अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

५.२.४ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे अथवा / व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तसेच मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.

५.२.५ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

५.२.६ पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने, पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच उमेदवारांना कळविले जाणार नाही.

५.३ मुख्य परीक्षा :-

५.३.१ परीक्षेचे टप्पे:- दोन. लेखी परीक्षा व मुलाखत

५.४ मुख्य परीक्षेस प्रवेश :-

५.४.१ पूर्व परीक्षेकरिता विहित केलेल्या मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

५.४.२ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या ईमेलद्वारे अथवा / व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

५.४.३ मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना उमेदवाराला परीक्षेचे माध्यम निवडावे लागेल. तसेच एकदा निवडलेले माध्यम कोणत्याही परिस्थितीत बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही.

५.५ परीक्षा योजना :-

५.५.१ परीक्षेचे टप्पे:- दोन (१) लेखी परीक्षा २०० गुण (२) मुलाखत ५० गुण

५.५.२ प्रश्नपत्रिकांची संख्या :- दोन अनिवार्य. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

पेपर क्रमांक	विषय	विषय संकेतांक	कालावधी	गुण	प्रश्नपत्रिकेचे स्वरूप	माध्यम	दर्जा
१	(a) Civil Procedure Code (b) Transfer of Property Act (c) Specific Relief Act (d) Law of Contracts,Sale of Goods Act and Partnership Act	०७१	तीन तास	१००	पारंपरिक	मराठी व इंग्रजी	पदाला साजेसा
२	(a) Indian Penal Code (b) Evidence Act (c)Code of Criminal Procedure (d) Scheduled Castes & Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act 1989 and Protection of Civil Rights Act 1955 (e)Essay on Current Legal topics (अंदाजे ८०० शब्दांचा)	०७२	तीन तास	१००	पारंपरिक	मराठी व इंग्रजी	पदाला साजेसा

५.५.३ आयोगाकडून उमेदवारांना परीक्षेच्या वेळी पुरविण्यात येणा-या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे.

५.५.४ मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुरवणी उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

६. परीक्षा केंद्र :-

६.१ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पूर्व व मुख्य परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येते. :-

केंद्र	केंद्राचा सांकेतांक
औरंगाबाद	**१५**
मुंबई	**३०**

केंद्र	केंद्राचा सांकेतांक
नागपूर	**३२**

६.२ अर्जातील मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

६.३ उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

६.४ उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

६.५ जर एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

६.६ अर्जात एकदा नमूद केलेल्या केंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

७. लेखी परीक्षेचा निकाल:-

७.१ वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

७.२ रिक्त पदांच्या १:३ या गुणोत्तर प्रमाणात उमेदवार मुलाखतीसाठी उपलब्ध होतील,अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (cut off line) निश्चित करण्यात येईल.

७.३ प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये ५० गुणांहून कमी नाही एवढे गुण मिळविणारे उमेदवारच मुलाखतीसाठी पात्र असतील.

७.४ महाराष्ट्र शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या जाती/जमातीमधील उमेदवारांच्या बाबतीत प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ४५ टक्के गुण मिळविणारे उमेदवारच मुलाखतीसाठी पात्र असतील.

८. मुलाखत :-

८.१ वरील परिच्छेद क्रमांक ७ नुसार उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत ५० गुणांची असेल.

८.२ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्ती यांची मूळ कागदपत्राच्या आधारे तपासणी केली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

८.३ विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

८.४ वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाचा आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

८.५ उमेदवाराची मानसिक दक्षता, कायद्याचे ज्ञान, स्पष्ट व तर्कशुध्द निर्णयक्षमता, न्यायनिर्णयांचा समतोलपणा, कौशल्य, दृष्टीकोन, नीतीतत्वे, आकलन शक्ती, संवाद क्षमता, चारित्र्य, बौद्धिक सखोलता आणि उमेदवाराची आवड यांचे मुल्यमापन करुन या संवर्गासाठी योग्यता निश्चित करणे हा मुलाखतीचा हेतू आहे.

८.६ मुलाखतीमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणारे उमेदवारच अंतिम निवडीसाठी पात्र राहतील.

९. अंतिम निवड :-

९.१ कामगिरीचे मूल्यमापन करण्याची पद्धत ही लेखी परीक्षा व मुलाखत यामध्ये मिळालेल्या संख्यात्मक गुणानुसार विनिर्दिष्ट करण्यात येईल.

९.२ लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

१०. शिफारस :-

"**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**"**मध्ये** नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

११. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-

११.१ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळी सदर पदावर तीन वर्ष कार्यरत राहणार आहे; याबाबतचे रुपये २,००,००० (रुपये दोन लाख) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे बंधनकारक राहील.

११.२ प्रस्तुत पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला कोणत्याही न्यायालयात किंवा त्या न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयात सेवेत असताना सेवा समाप्ती झाल्यापासून दोन वर्षापर्यंत वकिली व्यवसाय करण्यास प्रतिरोध करण्यात येईल आणि सेवा समाप्त झाल्यापासून अशा न्यायालयांमध्ये दोन वर्षासाठी वकिली व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

११.३ खालीलपैकी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र असणार नाही :-

११.३.१ न्यायिक सेवेतून किंवा शासनाच्या किंवा सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा न्यायिक सेवेतील किंवा शासनाच्या किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील कोणत्याही पदाचा परिविक्षा कालावधी पूर्ण केला नसेल किंवा

११.३.२ नैतिक अधोगतीचा समावेश असणा-या गुन्हयांच्या अपराधासाठी सिध्दपराधी ठरविण्यात आले असेल किंवा उच्च न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमचे प्रतिरोधित केले असेल किंवा अनर्ह ठरविले असेल किंवा

११.३.३ उमेदवारीकरिता कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव टाकला असेल किंवा

११.३.४ उमेदवार पुरुष असेल व त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी असतील आणि उमेदवार स्त्री असेल तर हयात पत्नी असलेल्या पुरुषाशी स्त्रीने विवाह केला असेल किंवा

११.३.५ दोनपेक्षा अधिक मुले असतील .

****